# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. १५ अंतर्गत बटुकभाई ज्वेलर्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नविन धरमपेठ
**{प्रकल्प विभाग}** येथील चौकाचे नाव" कै. डॉ. श्री. विनायक गोविंद दुर्गे उपाख्य कवि दुर्गेश चौक " असे नामकरण करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

टिप %&

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील अनुसुची " घ " प्रकरण ११ मधील २ (१) नुसार वरील चौकाचे नामकरण करण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी दिनांक १२/०२/२०२४ ला मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

३. मा. श्री.संदिप जोशी, मानद सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महोराष्ट्र राज्य यांचे संमतीपत्र.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 48/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 20/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग -1 यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. १५ अंतर्गत बटुकभाई ज्वेलर्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नविन धरमपेठ येथील चौकाचे नाव" कै. डॉ. श्री. विनायक गोविंद दुर्गे उपाख्य कवि दुर्गेश चौक " असे नामकरण करण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.